पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १७९। किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । शनिवार २५/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# सीजेपीच्या दोन मागण्या सरकारकडून मान्य

## धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यावर ठाम; सरकार शनिवारी करणार निर्णय

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) : सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी उपोषण मागे घेतले असले, तरी दिल्लीतील सीजेपीचे आंदोलन अद्याप सुरूच आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार सीजेपीने व्यक्त केला आहे. दरम्यान, आज सीजेपीच्या शिष्टमंडळाची केंद्र सरकारच्या प्रतिनिधींशी सुमारे तासभर महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत संघटनेच्या तीनपैकी दोन मागण्यांबाबत सरकारने तत्त्वतः सकारात्मक भूमिका घेतल्याचे समोर आले आहे.

**सीजेपीच्या प्रमुख मागण्या**

सीजेपीचे प्रवक्ते आशुतोष रंका यांनी बैठकीनंतर माहिती देताना सांगितले की, संघटनेने सरकारसमोर पुढील तीन प्रमुख मागण्या मांडल्या होत्या :

- केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा.
- नीट परीक्षेशी संबंधित घटनांमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत द्यावी.
- आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले एफआयआर आणि अन्य कायदेशीर कारवाई मागे घ्यावी.

**दोन मागण्यांवर सरकारचा सकारात्मक प्रतिसाद**

रंका यांच्या मते, विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देणे आणि आंदोलनादरम्यान दाखल करण्यात आलेले एफआयआर मागे घेण्याबाबत सरकारने तत्त्वतः सकारात्मक भूमिका दर्शविली आहे. मात्र, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी सरकारने उद्या दुपारी २ वाजेपर्यंतचा अवधी मागितला आहे. या मागणीवरही सरकार सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा सीजेपीने व्यक्त केली आहे.

**राहुल गांधींचा सरकारवर हल्लाबोल**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी धर्मेंद्र प्रधान यांच्यावर तीव्र टीका केली. धर्मेंद्र प्रधान हे अपयशी शिक्षणमंत्री असून देशाच्या शिक्षण व्यवस्थेच्या ढासळण्याचे प्रतीक आहेत. त्यांनी पदावरून पायउतार व्हावे, अशी मागणी त्यांनी केली.



राहुल गांधी यांनी आंदोलनादरम्यान जखमी झालेल्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यांनी एका विद्यार्थ्याच्या हातावरील जखम माध्यमांना दाखवत, एका विद्यार्थ्याने डोळाही गमावल्याचा दावा केला.

**संसदेतही गदारोळ**

लोकसभेत नीट पेपरफुटी प्रकरणावर चर्चा करण्यास सरकार तयार असल्याचे संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले. विरोधकांनी सभागृहाचे कामकाज सुरळीत चालू द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. दुसरीकडे, राहुल गांधी यांनी सभागृहात आपल्याला बोलू दिले जात नसल्याचा आरोप करत, माझा माईक बंद करण्यात आला, असा दावा केला. दरम्यान, केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी राज्यसभेत 'वंदे मातरम् विधेयक' सादर केले. मात्र, सभागृहातील गोंधळामुळे ते मंजूर होऊ शकले नाही. अखेर दोन्ही सभागृहे २७ जुलैपर्यंत तहकूब करण्यात आली.

**मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटी (उउड) आणि कॅबिनेट कमिटी ऑन इकॉनॉमिक अफेअर्स यांच्या बैठका झाल्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत पेपर लीक प्रतिबंधक कायद्यात सुधारणा करणाऱ्या विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी देण्यात आली.

**सुधारित विधेयकातील प्रमुख तरतुदी**

- पेपरफुटीच्या प्रकरणांची सुनावणी फास्ट ट्रॅक न्यायालयात होईल.
- तपास आणि निकालाची प्रक्रिया तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट.
- दोषींना १० वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा.
- १० कोटी रुपयांपर्यंत दंड
- तीन महिन्यात निकालाचे बंधन
- Public Examinations (Prevention of Unfair Means) Act, २०२४ अधिक कठोर करण्याचा प्रस्ताव.

**पंतप्रधान मोदींचे स्पष्ट संकेत**

यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेपरफुटी हा अत्यंत गंभीर विषय असल्याचे सांगितले होते. पेपरफुटी ही लाखो विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबांच्या भविष्याशी संबंधित बाब आहे. त्यामुळे दोषींविरुद्ध कठोर कारवाई करण्यासाठी सरकार प्रभावी कायदा आणणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले होते.

**सरकारचे दुहेरी प्रयत्न**

एकीकडे केंद्र सरकारने पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायदेशीर उपाययोजना करण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत, तर दुसरीकडे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून परिस्थिती शांत करण्याचे प्रयत्नही सुरू ठेवले आहेत. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत सरकार काय निर्णय घेते, याकडेविद्यार्थी, विरोधी पक्ष आणि देशभरातील जनतेचे लक्ष लागले आहे.

# भंडारदऱ्यात अतिवृष्टीचा कहर; धरणातून 14,000 क्युसेक विसर्ग

तालुक्यात पावसामुळे २२ घरांची पडझड झाली असून, दोन जनावरे दगावली असल्याची माहिती महसूल प्रशासनाने दिली आहे.भंडारदरा येथील मारुती दगडू खाडे आणि ज्ञानेश्वर मारुती खाडे यांच्या घराचे पत्रे उडाले.मुतखेल येथील विजय हरिभाऊ शिंदे यांचा खिलारी बैल दगावला. आंबेवंगण येथील प्रकाश त्रिंबक खाडे यांचे घराचे पत्रे उडाले व भिंत पडली. पावसाने नुकसान झाले असून, वारंघुशी ते शेंडी भंडारदरा या रस्त्यावर दरड कोसळल्याने वाहतूक ठप्प झाल्याचे समजते.


राजूर (प्रतिनिधी) - अकोले तालुक्यातील भंडारदरा पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून धरणांतील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. भंडारदरा धरण ९१ टक्के भरल्याने पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी स्पिलवे गेटमधून १०,८९४ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे प्रवरा नदी दुथडी भरून वाहत असून रंधा धबधब्याने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे. प्रशासनाने प्रवरा नदीकाठच्या तसेच लाभक्षेत्रातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

भंडारदरा धरणातून सोडण्यात येणारे पाणी पुढे निळवंडे धरणात जमा होत असून तेही ५६ टक्के भरले आहे. दरम्यान, आढळा धरण ओव्हरफ्लो झाल्याने परिसरातील जलप्रवाह अधिक वेगाने सुरू आहेत. त्यामुळे पाणलोट व लाभक्षेत्रातील गावांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. भंडारदरा परिसरात सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने मोठे नुकसान केले. अनेक घरांवरील पत्रे उडून गेली, काही घरे अंशतः उद्ध्वस्त झाली, तर अनेक ठिकाणी रस्त्यांवर झाडे कोसळल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली.

भंडारदरा गावातील माऊली खाडे यांच्या घरावरील पत्रे वादळामुळे उडून गेल्याने घराचे मोठे नुकसान झाले. प्रशासनाने अशा बाधित कुटुंबांना तात्पुरता निवारा व आपत्कालीन मदत उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्याची 'चेरापुंजी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घाटघर येथे २२० मिमी, रतनवाडी येथे २०६ मिमी, पांजरे येथे २०३ मिमी, तर भंडारदरा येथे १८२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या विक्रमी पावसामुळे सर्व ओढे-नाले तुडुंब भरून वाहत असून धबधबेही पूर्ण क्षमतेने कोसळत आहेत. पाटबंधारे विभागाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय नदी, नाले, धरण परिसर आणि धबधब्यांच्या ठिकाणी जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे.दरम्यान, भंडारदरा धरणातील पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी शाखा अभियंता सागर ढोकणे, वसंत भालेराव व पाटबंधारे विभागाचे कर्मचारी सातत्याने परिस्थितीवर लक्ष ठेवून धरण व्यवस्थापन करत आहेत. प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने नजर ठेवली जात असून आवश्यकतेनुसार विसर्गात बदल केला जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.



छाया - विलास तुपे, राजूर











Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# ग्राहकांच्या प्रश्नांवर ना.भुजबळांकडून तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश



मुंबई : ग्राहक पंचायतीच्या शिष्टमंडळाने अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेऊन ग्राहक आयोगाच्या सक्षमीकरणासह ग्राहकांशी संबंधित विविध महत्त्वाचे प्रश्न त्यांच्या निदर्शनास आणून दिले.

शिष्टमंडळाने ग्राहक आयोगाचे सक्षमीकरण, प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा, ऑनलाइन सुनावणी प्रभावीपणे राबविणे तसेच ग्राहक आयोगातील अध्यक्ष व सदस्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी केली. याशिवाय महानगर गॅसची चुकीची बिले, महावितरणकडून स्मार्ट मीटरची सक्ती, हॉटेलांमध्ये औद्योगिक बर्फाचा वापर, खराब रस्त्यांवर पथकर (टोल) वसुली, छापील किंमत कायद्यात सुधारणा, रुग्णालयांकडून अंतर्गत औषध विक्री केंद्रातून औषधे घेण्याची सक्ती आणि एसटी महामंडळाच्या अधिकृत थांब्यांवर जादा दराने खाद्यपदार्थांची विक्री अशा अनेक ग्राहकहिताच्या मुद्द्यांकडेही लक्ष वेधण्यात आले. या सर्व मुद्द्यांवर मंत्री छगन भुजबळ यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. संबंधित विभागांकडे ग्राहकांच्या तक्रारी पाठवून त्यांचे त्वरित निराकरण करण्यास सांगावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भुजबळ यांनी विशेषतः महानगर गॅसची चुकीची देयके, महावितरणची स्मार्ट मीटर सक्ती, खराब रस्त्यांवरील टोल वसुली, आरटीओकडून स्मार्ट कार्ड वेळेत न मिळणे, छापील किंमत निश्चितीबाबत कायद्यात सुधारणा आणि रुग्णालयांकडून औषध खरेदीची सक्ती यासारख्या प्रश्नांवर संबंधित विभागांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश बैठकीत दिले. ग्राहकांच्या हिताचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

# देशव्यापी शैक्षणिक बंदला अकोल्यात जोरदार प्रतिसाद



अकोले (प्रतिनिधी) - जंतर-मंतर या ठिकाणी झालेल्या लाठी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी व केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मागण्यासाठी आंदोलकांनी आज दिनांक २४ जुलै रोजी देशव्यापी शैक्षणिक बंदची हाक दिली होती.

अकोले येथे यानुसार अगस्ती कॉलेज येथे तालुक्यातील विद्यार्थी संघटनांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत विद्यार्थ्यांनी अकोले कॉलेज बंद केले. हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरले. अकोले कॉलेज ते एस. टी स्टँड अशी रॅली काढून दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा व्यक्त केला. एस. एफ. आय. व छात्र भारती या विद्यार्थी संघटना व डी वाय एफ आय या युवक संघटनेने यासाठी विशेष पुढाकार घेतला. डॉ अजित नवले, विशाल शिंदे, गणेश ताजणे, सदाशिव साबळे, अच्युत वैद्य, विशाल बोऱ्हाडे, तेजस्विनी माघाडे, अवधूत नवले, श्रीपाद डावरे, शीतल झोळेकर, सुनंदा मेढे, युवराज भांगरे आदींनी मोर्चाचे नेतृत्व केले. आंदोलनाचा पुढील टप्पा ठरवण्यासाठी तालुक्यातील सर्व विद्यार्थी संघटनांची एकत्र बैठक घेण्यात येत असून अकोले शहरातील सर्व कॉलेज व शाळा तसेच कोतुळ राजुर समशेरपुर येथील सर्व शाळा व कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची एकजूट निर्माण करून लढा तीव्र करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला आहे.

# 'चरणसेवा'ने जपले ५ लाख वारकऱ्यांचे आरोग्य





मुंबई (प्रतिनिधी) गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमाचा समारोप शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला. यंदाच्या आषाढी वारीत राज्यातील १४ जिल्ह्यांतील ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांनी थेट चरणसेवा आणि आरोग्यसेवेचे लाभ घेतला. आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक ताण, स्नायूदुखी, पायांना येणारे फोड, थकवा तसेच पावसाळ्यातील संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. मागील वर्षी सात जिल्ह्यांमध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचा यंदा विस्तार करून तो दिंडी मार्गावरील १४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला.

या चौदा जिल्ह्यांत उपक्रम - सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, वाशिम, सांगली, अमरावती आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतील १४० मुक्कामस्थळांवर सेवा केंद्रे उभारण्यात आली. या केंद्रांमधून वारकऱ्यांना चरणसेवा, मोफत आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, प्रथमोपचार, आवश्यक औषधांचे वितरण, रुग्णवाहिका सुविधा तसेच गरजेनुसार पुढील उपचारांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली.

३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा वापर - या उपक्रमात १६४ आरोग्य संस्थांनी सहभाग घेतला. ७ हजार ५३८ स्वयंसेवक तसेच ११ हजार ३३१ डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवाकार्यात योगदान दिले. सेवेसाठी १० हजार टी-शर्ट आणि ३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा उपयोग चरणसेवेसाठी करण्यात आला. तसेच ८ रथांद्वारे जनजागृती करण्यात आली. लोकसहभागातून साकारण्यात आलेल्या या उपक्रमातून तब्बल ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांना प्रत्यक्ष चरणसेवा आणि आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

दिंडीत अवयव दानावर जनजागृती - उपचारांबरोबरच आरोग्य जनजागृतीलाही विशेष महत्त्व देण्यात आले. आरोग्य जनजागृती रथांद्वारे स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, रक्तदान, अवयवदान संदर्भात जनजागृती, निरोगी जीवनशैली तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती वारकऱ्यांपर्यंत आरोग्य रथाच्या माध्यमातून पोहोचविण्यात आली राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये ४ लाख ९६ हजारांपेक्षा अधिक वारकऱ्यांपर्यंत 'चरणसेवा' पोहोचविता आली, याचा आनंद आहे.

> या उपक्रमाच्या यशामागे लोकसहभाग हीच सर्वात मोठी ताकद ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेला विविध आरोग्य संस्था, दानशूर व्यक्ती, डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी आणि हजारो स्वयंसेवकांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्यामुळे हे सेवाकार्य यशस्वी झाले.
>
> **रामेश्वर नाईक - कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष**

# फुटपाथवर बांधकामाचा राडारोडा तातडीने हटविण्याची नागरिकांची मागणी

**१३२ के. व्ही. (सब-स्टेशन) संरक्षक कंपाऊंड भिंतीची दुरुस्ती**

संगमनेर (प्रतिनिधी) - नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील संगमनेर महाविद्यालयाजवळ असलेल्या १३२ के.व्ही. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या उपकेंद्राच्या (सब-स्टेशन) संरक्षक कंपाऊंड भिंतीची दुरुस्ती नुकतीच करण्यात आली. मात्र या कामातून निघालेला बांधकामाचा मलबा व राडारोडा अद्यापही महामार्गालगतच्या फुटपाथवर तसेच रस्त्याच्या कडेला अस्ताव्यस्त पडून असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या राडारोड्यामुळे फुटपाथवरून पायी चालणारे नागरिक, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच महिला यांना मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे. अनेकांना फुटपाथ सोडून थेट महामार्गावरून चालावे लागत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. तसेच रस्त्यालगत पडलेल्या मलब्यामुळे वाहनचालकांनाही अडथळा निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

महामार्गावरील सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन बांधकामाचा संपूर्ण मलबा हटवावा, फुटपाथ स्वच्छ करून नागरिकांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# आषाढी एकादशी : श्रद्धा, आत्मपरीक्षण आणि कर्मयोगाचा संदेश



आषाढी एकादशी अर्थात देवशयनी एकादशी हा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव आणि भक्तीचा सर्वोच्च सोहळा मानला जातो. पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी ज्ञानोबा-तुकारामचा अखंड गजर करत पायी वारी करतात. भक्ती, समर्पण, शिस्त, समता आणि माणुसकी यांचे अद्वितीय दर्शन घडविणारा हा सोहळा केवळ धार्मिक उत्सव नसून भारतीय संस्कृतीचा जिवंत वारसा आहे.

पुराणानुसार, या दिवशी भगवान विष्णू चार महिन्यांच्या योगनिद्रेत जातात आणि सृष्टीची जबाबदारी भगवान शंकरांवर सोपवतात. म्हणूनच आषाढी एकादशीपासून चातुर्मासाला प्रारंभ होतो. या काळात शिवोपासनेला विशेष महत्त्व आहे. मात्र, देव झोपतो ही कल्पना केवळ धार्मिक आख्यायिका नसून त्यामागे जीवनाला दिशा देणारा गूढ संदेश दडलेला आहे. या चार महिन्यांत प्रत्येकाने आत्मपरीक्षण करावे, आपल्या आचरणाचा विचार करावा आणि अधिक सजग, सुसंस्कृत जीवन जगण्याचा संकल्प करावा, हा त्यामागील खरा हेतू आहे. पंढरपूर हे वारकऱ्यांचे माहेरघर आहे. भीमा नदीच्या काठावर वसलेल्या या पवित्र क्षेत्रात नदीचे पात्र चंद्रकोरीसारखे असल्याने तिला चंद्रभागा असे नाव प्राप्त झाले. पुराणकथेनुसार, प्रजापती दक्षांच्या शापामुळे क्षीण झालेल्या चंद्रदेवाने या नदीत स्नान करून शापमुक्ती मिळवली. त्यामुळे या नदीला चंद्रभागा हे नाव प्राप्त झाल्याचे सांगितले जाते.

भारतीय संस्कृतीत विविध व्रतांच्या माध्यमातून मनुष्याला संयम, सत्य आणि सदाचाराचा मार्ग दाखविण्यात आला आहे. उपनिषदांनी शरीराची तुलना रथाशी, इंद्रियांची घोड्यांशी आणि मनाची लगामाशी केली आहे. मनावर नियंत्रण मिळवणे म्हणजेच यशाचा राजमार्ग होय. दहा इंद्रियांनंतर मनाला अकरावे इंद्रिय मानले जाते. म्हणूनच अकराव्या तिथीला येणाऱ्या एकादशीला विशेष महत्त्व आहे. एकादशी म्हणजे मनावर अंकुश ठेवण्याचा दिवस.

उपवास या शब्दाचाही अर्थ अत्यंत सुंदर आहे. 'उप' म्हणजे जवळ आणि 'वास' म्हणजे राहणे. म्हणजेच उपवास म्हणजे देवाच्या अधिक जवळ जाणे. या दिवशी केवळ अन्नत्याग न करता मन शुद्ध करणे, विठ्ठलाच्या नामस्मरणात रमणे आणि अंतःकरण भक्तीने भरून टाकणे, हेच खरे एकादशीचे व्रत आहे. लंघन हा आरोग्यदायी नियमही याच दिवशी आचरला जातो.

पांडुरंग शास्त्री आठवले यांनी देवशयनी एकादशीचे अत्यंत अर्थपूर्ण विवेचन केले आहे. त्यांच्या मते, देवाची चार महिन्यांची निद्रा म्हणजे कर्मयोग्यांसाठी दिलेला महान संदेश आहे. या काळात सृष्टी हिरवागार शालू पांघरते. पाऊस पडतो, नद्या-नाले भरून वाहतात, शेतात पिके डोलू लागतात आणि सर्वत्र समृद्धीचे वातावरण निर्माण होते. माणूस म्हणतो, भगवंता, तू किती सुंदर सृष्टी निर्माण केलीस! तेव्हा भगवंत जणू सांगतो, मी तर निद्रिस्त होतो; हे सर्व तुझ्या परिश्रमाचे, पुरुषार्थाचे आणि कर्मयोगाचे फळ आहे. यापेक्षा मोठा कर्मयोगाचा संदेश कोणता असू शकतो?

आजच्या काळातही या विचाराची गरज अधिक आहे. जर माणूस विवेक, संस्कार आणि माणुसकी विसरून केवळ स्वार्थाच्या मागे धावत राहिला, तर देवही जणू त्याच्यापासून अलिप्त होईल. परंतु जर माणूस जबाबदारीने, प्रामाणिकपणे आणि विश्वासाने जीवन जगला, तर देवाची ती योगनिद्राही आपल्या विश्वासाचे प्रतीक ठरते.

चातुर्मासात अनेक सण, व्रते आणि धार्मिक पर्व येतात. या सर्वांचा मूळ संदेश एकच आहे-संयमी, व्रतनिष्ठ आणि मूल्याधिष्ठित जीवन जगणे. आषाढी एकादशीला लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरीत एकत्र येतात. त्यांच्या मुखी अखंड हरिनाम असते आणि मनात एकच ध्यास-विठ्ठलाचे दर्शन.

खरे तर विठ्ठलाचे दर्शन म्हणजे केवळ मूर्ती पाहणे नव्हे; तर अंतःकरणात भक्ती, प्रेम, समता आणि सेवाभाव जागविणे होय. अनेकांना देवाचे प्रत्यक्ष दर्शन होत नाही, तरी ते मंदिराच्या कळसाचे दर्शन घेऊनही तितक्याच आनंदाने घरी परततात. कारण श्रद्धा ही दर्शनापेक्षा मोठी असते.

वारीचे व्यवस्थापन हा जगासाठी अभ्यासाचा विषय आहे. लाखो लोक, निमंत्रण नाही, नोंदणी नाही, कोणताही दिखावा नाही; तरी तारीख निश्चित, मार्ग निश्चित आणि शिस्तही विलक्षण. हे सर्व श्रद्धा, विश्वास आणि सामूहिक संस्कार यांच्या बळावर उभे आहे. यालाच खरी श्रद्धा म्हणतात; अंधश्रद्धा नव्हे.

बहुत सुकृताची जोडी, म्हणून विठ्ठल आवडी... आणि हरी मुखे म्हणा, हरी मुखे म्हणा, पुण्याची गणना कोण करी... हे संतांचे वचन आजही तितकेच समर्पक आहे. हरिनाम घेण्यासाठी संसार सोडण्याची आवश्यकता नाही. शुद्ध भावनेने, निःस्वार्थ श्रद्धेने घेतलेले हरिनाम मनाला शांतता, जीवनाला दिशा आणि विचारांना व्यापकता देते. हरिपाठ हा केवळ ग्रंथ नाही; तो जीवन जगण्याची ब्लूप्रिंट आहे.

आषाढी एकादशी हा केवळ सण नाही; तो श्रद्धा, आत्मपरीक्षण, कर्मयोग, समता, सेवा आणि भक्ती यांचा उत्सव आहे. संतांनी पंढरीच्या वाटेवर अमृताचा सडा शिंपडला आहे. त्या वाटेवरून चालताना प्रत्येक वारकरी केवळ पंढरपूर गाठत नाही, तर स्वतःच्या अंतर्मनातील विठ्ठलालाही भेटतो. या पवित्र आषाढी एकादशीच्या निमित्ताने एकच प्रार्थना- हे विठ्ठला, तुझ्या चरणी अखंड श्रद्धा राहू दे. मुखी तुझे नाम, हृदयात तुझे प्रेम आणि कर्मात तुझी प्रेरणा लाभू दे. सर्वांच्या जीवनात सुख, समाधान, सद्बुद्धी आणि माणुसकी नांदो. रामकृष्ण हरी! विठ्ठल विठ्ठल! ज्ञानोबा-तुकाराम!

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# पुष्पा सूर्यवंशी यांचे निधन



संगमनेर : येथील विश्वकर्मा समाजातील ज्येष्ठ सदस्य सौ. पुष्पा विजय सूर्यवंशी यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने विश्वकर्मा समाजात हळहळ व्यक्त होत असून, समाजातील विविध संस्था व पदाधिकाऱ्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबीयांसह मोठा आप्तपरिवार आहे.

त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रपरिवार आणि समाजबांधवांनी त्यांच्या निवासस्थानी धाव घेत अंतिम दर्शन घेतले. कै. सौ. पुष्पा विजय सूर्यवंशी यांना विश्वकर्मा नागरी सहकारी पतसंस्था, विश्वकर्मा भजनी मंडळ, विश्वकर्मा महिला मंडळ, विश्वकर्मा युवक संघटना, विश्वकर्मा मंदिर ट्रस्ट (संगमनेर), श्री भगवान विश्वकर्मा मंदिर ट्रस्ट (अकोले तालुका), श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज संस्था (आळंदी देवाची), श्री विश्वकर्मा मंदिर ट्रस्ट (नाशिक), सुतार समाज धर्मशाळा (श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर) तसेच अखिल भारतीय सुतार-लोहार संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. पुष्पा विजय सूर्यवंशी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# झरेकाठीत बिबट्याची पुन्हा दहशत

## शेळ्यांच्या गोठ्यावर हल्ला, शेळी जखमी






संगमनेर (प्रतिनिधी) संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथे बिबट्याची दहशत कायम असून दोन दिवसांपूर्वी संदीप वाणी यांच्यावर हल्ला केल्यानंतर आता त्याच परिसरातील शेळ्यांच्या गोठ्यावर बिबट्याने हल्ला करून एक शेळी जखमी केल्याची घटना शुक्रवारी (दि. २४ जुलै) पहाटे पाचच्या सुमारास घडली. झरेकाठी येथील गट क्रमांक १८२ मधील संपत गेनू वाणी यांच्या राहत्या घराजवळील शेळ्यांच्या गोठ्यात बिबट्याने प्रवेश केला. वीट बांधकाम असलेल्या गोठ्याच्या भिंतीतील विटा बाजूला करून बिबट्याने आत प्रवेश करत शेळीवर हल्ला केला. या हल्ल्यात शेळी जखमी झाली.

शेळ्यांच्या आरडाओरडाचा आवाज ऐकून लता वाणी या झोपेतून जाग्या झाल्या. त्यांनी तत्काळ गोठ्याकडे धाव घेत मोठ्याने आरडाओरड केल्याने बिबट्याने तेथून पळ काढला. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. दोन दिवसांपूर्वी संदीप वाणी यांच्यावर बिबट्याने हल्ला केल्याची माहिती वन विभागाला देण्यात आली होती. त्यानंतर वन विभागाने परिसरात पिंजरा लावला असला, तरी तो वस्तीपासून दूर लावल्याने बिबट्या त्यात अडकलेला नाही, अशी ग्रामस्थांची तक्रार आहे.

या पार्श्वभूमीवर वन विभागाने तातडीने योग्य ठिकाणी पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी झरेकाठी येथील जनसेवा युवा मंचाचे सदस्य व सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ डोळे यांनी केली आहे. परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून वन विभागाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही ग्रामस्थांकडून होत आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त संगमनेर पुरोहित संघाचा सात दिवसीय सेवा सप्ताह



संगमनेर (प्रतिनिधी) : महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त संगमनेर पुरोहित संघाच्या वतीने दि. २२/७/२६ ते २८/७/२६ या कालावधीत सात दिवसीय सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजहित, पर्यावरण संवर्धन व जनजागृती या उद्देशाने विविध सामाजिक उपक्रम या सेवा सप्ताहात राबविण्यात येणार आहेत.

सेवा सप्ताहात वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन अभियान, रक्तदान, दिंडी, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक व उपयोगी वस्तूंचे वाटप, सडक सुरक्षा जनजागृती अभियान तसेच स्वच्छता अभियान आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून समाजात सेवाभाव, सामाजिक उत्तरदायित्व आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या उपक्रमांमध्ये विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, सर्व नागरिकांनी या सेवा सप्ताहात सहभागी होऊन उपक्रम यशस्वी करावेत, असे आवाहन संगमनेर पुरोहित संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणाऱ्या या सेवा सप्ताहामुळे समाजोपयोगी कार्याला चालना मिळणार असून, संगमनेर शहर व परिसरात सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# अकोलेतून एसएमबीटी हॉस्पिटलसाठी मोफत बससेवा




अकोले (प्रतिनिधी) - तालुक्यातील रुग्णांना उपचारासाठी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ये-जा करणे अधिक सुलभ व्हावे, या उद्देशाने अकोले-एसएमबीटी हॉस्पिटल मोफत बससेवेचा शुभारंभ आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी आमदार डॉ. लहामटे यांनी बसचे विधिवत पूजन केले. यावेळी संदीप गायकवाड, लक्ष्मीकांत वारंघुसे, अक्षय आभाळे, हरिभाऊ फापाळे, महिपाल देशमुख, डॉ. संदीप कडलग, दत्ता नवले, पराग वाडगे, सचिन पवार, डॉ. आसिफ तांबोळी, अमोल सावंत, रियाज शेख आदी उपस्थित होते. यामुळे ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, उपचारासाठी होणारा प्रवसाचा आर्थिक भारही कमी होणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि गंभीर आजारांवरील उपचारासाठी वारंवार हॉस्पिटलमध्ये जावे लागणाऱ्या रुग्णांसाठी ही सेवा लाभदायी ठरणार आहे. ही बस दर मंगळवार, गुरुवार आणि शनिवार यादिवशी सकाळी ८ वाजता नियमित धावणार असून, ओपीडी, तपासणी, शस्त्रक्रिया, डायलिसिस व इतर उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांना याचा लाभ घेता येणार आहे

# अहिल्यानगर जिल्हा बँकेचे मतदार निम्म्याने घटणार ; तालुकानिहाय ठराव




अहिल्यानगर (प्रतिनिधी) - जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची प्रारूप मतदार यादी तयार करण्यासाठी सहकार विभागाच्या जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे, बँकेच्या सभासद संस्थांचे ३ हजार १२८ ठराव संकलीत झाले आहेत. बँकेच्या सभासद संस्थांची संख्या ५ हजार ८९० आहे. त्यातुलनेत संकलित झालेल्या ठरावांची संख्या अत्यंत कमी आहे. यातही अनेक ठराव हे बंद पडलेल्या संस्थांचे असून सहाकार विभागाच्या नियमांच्या चाळणी बंद पडलेल्या संख्याचे ठराव वगळल्यानंतर जिल्हा बँकेसाठी अवघे २ हजार ५०० ते ३ हजारांच्या दरम्यान ठराव राहणार असल्याचा अंदाज आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी तयार करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे सभासद संस्थांनी १६ जुलैपर्यंत ठराव पाठवण्याची मुदत होती. त्यानुसार जिल्हाभरातून संकलित झालेले ठराव ३ हजार १२८ ठराव संकलीत झाले आहेत. ठराव आलेल्या संख्या सुरू आहेत की नाहीत. नियमानुसार त्या मतदानास पात्र आहेत की याची तपासणी सहकार विभागाकडून करण्यात येणार आहे. बँकेच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी तयार करण्यासाठी हे ठराव सहकार विभागाच्या सहनिबंधकांकडे (नाशिक) पाठवण्यात आले आहेत. या ठरावांची यादी छानननी करून पात्र नसलेले ठराव कमी केले जाणार आहेत. त्यानंतर प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

बँकेच्या सभासद असलेल्या अनेक संस्था अवसायानात निघालेल्या आहेत. काही बंद पडलेल्या आहेत, काहींची नोंदणी रद्द झालेली आहे, काही बंद पडलेल्या पतसंस्थांचे विलीनीकरण करण्यात आलेले आहे. शिवाय बँकेने १ जून २०१३ या अर्हता तारखेनुसार निवडणुकीसाठी सभासदांची संख्या निश्चित केलेली आहे तसेच शेअरची रक्कम पाच हजार रुपये भरलेले सभासदच मतदानासाठी पात्र ठरवले जाणार आहेत. त्यामुळे सभासद संस्थांकडून मतदारांच्या नावाचे ठराव आले असले तरी ते मतदानास पात्र म्हणजेच, प्रारूप मतदार यादी त्यांचा समावेश होईल असे नाही. त्यामुळे झालेल्या ठरावापेक्षा कमी संख्येने मतदार प्रारूप यादीत असण्याची शक्यता वर्तवली जाते.

बँकेसाठी विकास सेवा संस्था १ हजार ४१४ असल्या तरी ठराव १ हजार ३६७, बिगर शेती संस्थांची संख्या २ हजार ३३७ असताना मात्र ठराव १ हजार ५१८ तर शेतीपूरक संस्था २ हजार १३९ तर ठराव केवळ २४३ प्राप्त झाले आहेत. एकूण ५ हजार ८९० सभासद संस्थांपैकी ३१२८ ठराव संकलीत झाले आहेत. पंचवार्षिकच्या तुलनेत यंदा ठरावांची संख्या साडे पाच हजारांहून एकदम २ हजार ५०० ते ३ हजारांच्या दरम्यान राहणार असल्याचा अंदाज आहे. याचा अर्थ दरवर्षीच्या तुलनेत यंदा ठराव (मतदारांची संख्या) ही निम्म्याने घटणार आहे.

संगमनेर, कोपरगाव व अहिल्यानगर तालुक्यात सभासद संस्थांची संख्या सर्वाधिक आहे. मात्र तेथूनच अत्यंत कमी संख्येने ठराव प्राप्त झाले आहेत. याशिवाय इतरही तालुक्यातून प्राप्त झालेल्या ठरावांची संख्या कमी आहे.

तालुकानिहाय ठराव

संगमनेर ४०७, शेवगाव ९९, पाथर्डी १२१, कर्जत १४६, श्रीरामपूर १४३, कोपरगाव ४१८, पारनेर १९७, अकोले १६४, राहता १९५, नेवासा २३५, श्रीगोंदा २९३, अहिल्यानगर ३६५, जामखेड १०७ व राहुरी २३८.

## विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय,

(महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)
पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्याः, पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर
mail id - parnergbsspat03@gmail.com फोन नं. : ०२४८८ - २२२३५५

जा.क्र.१९५/पारनेर पत. पारनेर/ताबा नोटीस / सन २०२६- २७ दि.२०/०७/२०२६


**नमुना झेड**
**स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्याबाबतची नोटीस**
**( नियम १०७ पोटनियम (११ (ड - १) पहा)**

ज्याः अर्थी, पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, मर्या., पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर या संस्थेच्या खाली नमुद केलेल्या कर्जदार/ सहकर्जदार/जामीनदार यांचे विरुध्द सक्तीच्या मार्गाने कर्ज वसुलीसाठी. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये हुकुमनामा मिळविला आहे. ऋणको यांचे विरुध्द मिळालेल्या वसुली दाखल्या अन्वये त्या हुकुमनाम्याची अंमलबजावणी संस्थेचे वसुली अधिकारी हे करीत आहे. ऋणको अथवा थकबाकीदार कर्जदार/ सहकर्जदार/जामीनदार यांची तसेच त्यांची वडिलोपार्जीत जप्त केलेली निम्नलिखीत स्थावर मालमत्ता विक्री करुन कर्ज वसुल करायचे, आहे.ज्याअर्थी, खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी, यांनी ऋणको कर्जदार, सहकर्जदार / जामीनदार यांना महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६०चे नियम १९६१ चे कलम १५६ अन्वये मागणी नोटीस व जप्ती पुर्वीची नोटीस दिली असुन पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता यापुर्वीच जप्त केलेली आहे.ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्याने नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे नियम १९६१ चे कलम १५६ व नियम १०७ (११. (ड१) नुसार) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. ०७/०८/२०२६ रोजी कागदोपत्री. ताबा घेते आहे. कारण त्या शिवाय जाहीर विक्री करता येणार नाही...विशेष करुन ऋणकोला आणि सर्व नागरीकांना सावध करण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करु नये आणि व्यवहार केल्यास ऋणको कर्जदार / सहकर्जदार / जामीनदार यांच्या वसुली दाखल्यावरील बोजाची रक्कम कर्ज वसुल होईपर्यंत होणारे व्याज व. इतर आदेशिका खर्चासह अशा एकुण रकमेस अधिन रहावे लागेल. संबंधित ताबा घेतलेल्या स्थावर मालत्तेचे वर्णन खालील प्रमाणे -

| अ.नं. | कर्जदार/जामीनदार नावे व पत्ता | वसुली दाखला व रक्कम | म.स.सं. अधि. १९६० मधील कलम १५६ नियम १०७ नुसार कारवाई | ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णनः |
|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार - खोडाळ तान्हाजी भागचंद, रा. जामगाव, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - औटी संतोष गोविंद, रा. जामगाव, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - नाईक मंदा बाबासाहेब रा. जामगाव, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर | दाखला क्र.२२०/२०२२ दि.०८/०८/२०२२ रु. ९,२२,१८३/- व दिनांक १/०४/२०२२पासून १५% प्रमाणे होणारे व्याज | १) मागणी नोटीस दि. १०/०८/२०२२<br>२) जप्ती पुर्व नोटीस दि. ०९/०९/२०२२<br>३) स्थावर जप्ती आदेश दि. २४/१२/२०२२ | कर्जदार खोडाळ तान्हाजी भागचंद यांची मौजे जामगाव, ता. पारनेर, जि. अहिल्यानंगर येथिल स्थावर मिळकत गट नं. ९७६ पै. ० हे ३२.०० आर, जामीनदार औटी संतोष गोविंद यांची मौजे जामगाव, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथिल स्थावर मिळकत गट नं. ८२१ पै. ० हे ५२.०० आर, जामीनदार नाईक मंदा बाबासाहेब यांची मौजे जामगाव, ता. पारनेर, जि. अहिल्यानंगर येथिल स्थावर मिळकत गट नं. ५९४ पै. ० हे. ५७.०० आर पै. १/२ हिस्सा |
| २. | कर्जदार - कोल्हे आशा बाळासाहेब रा. पारनेर, ता. पारनेर जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - दैवज्ञ अनिल दत्तात्रय रा. पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - कोल्हे बाळासाहेव संपत, रा. पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - कोरडे दिपक बाळासाहेब रा. पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर | दाखला क्र..१९४/२०२२. दि. १३/०९/२०२२-रु. ४७,१३,१४४/-व दिनांक ०१/०४/२०२१ पासुनचे १५% प्रमाणे होणारे व्याज | १) मागणी नोटीस दि. १६/०९/२०२२<br>२) जप्ती पुर्व नोटीस दि. ०३/१०/२०२२<br>३) स्थावर जप्ती आदेश दि. ०१/०३/२०२४ | कर्जदार कोल्हे आशा बाळासाहेब यांची मौजे पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथिल सि.स.नं. ३८ पै. मधील ग्रा. फ्लोअर गाळा नं. क्षेत्र १६१.५६ चौ. फुट, बेसमेंट फ्लॅट नं. ब २ क्षेत्र ७६५.६९ चौ.फुट, ग्रा. फ्लोअर वरील प्लॅट नं. जी २ चे क्षेत्र ५१२.६४ चौ.फट |
| ३. | कर्जदार - पुजारी नामदेव बबन रा. सोबलेवाडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - फराटे सिताराम किशन, रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ह.मु. रूम नं. २, त्रिवेणी संगम को. ऑप. हौसिंग सोसा, प्लॉट नं. ए-१०, सेक्टर १२, कळंबोली<br>जामीनदार - फराटे रखमाजी किसन रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - सोबले बाळासाहेब धोंडिबा रा. सोबलेवाडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर | दाखला क्र.१७६/२०२५ दि.०८/०९/२०२५. रु. ७,६३,२४९/- व दिनांक ०१/०४/२०२५ पासूनचे १५% प्रमाणे होणारे व्याज | १) मागणी नोटीस दि. १३/११/२०२५<br>२) जप्ती पुर्व नोटीस दि. ०८/१२/२०२५<br>३) स्थावर जप्ती आदेश ०४/०६/२०२६ | जामीनदार फराटे सिताराम किसन यांची मौजे - करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथिल स्थावर मिळकत गट नं. ५५५ पै.. १ हे ५१.०० आर |
| ४. | कर्जदार - भोसले रामदास हनुमंत रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ह.मु. फ्लॅट नं. ६०४, त्रिमुर्ती संगम, संगमवाडी, मेजर राणे शाळेवळ, पुणे<br>जामीनदार - जाधव संपत बबन रा. अळकुटी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - भोसले अक्षय रामदास रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यांनगर ह.मु. फ्लॅट नं. ६०४, त्रिमुर्ती संगम, संगमवाडी, मेजर राणे शाळे जवळ, पुणे<br>जामीनदार - भोसले संगिता रामदास रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ह.मु. फ्लॅट नं. ६०४, त्रिमुर्ती संगम, संगमवाडी, मेजर राणे शाळे जवळ, पुणे | दाखला क्र. ९७४/२०२३ दि.१२/०२/२०२४ रु.८३,१५,२०६/- व दिनांक ०१/१०/२०२३ पासुनचे १४% प्रमाणे होणारे व्याज | १) मागणी नोटीस दि. १३/०२/२०२४<br>२) जप्ती पूर्व नोटीस दि. १८/०२/२०२४<br>३) स्थावर जप्ती आदेश दि. ०१/०८/२०२५ | कर्जदार - भोसले रामदास हनुमंत यांची मौजे करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथिल स्थावर मिळकत, गट नं. १२२० पै. ० हे ८९.०० व ० हे. ०९.६६ आर खराबा, गट नं. १२२१ पै. १ हे ७७.३३ व ० हे. २१.६६ आर खराबा, मौजे दरोडी, ता.- पारनेर, जि. अहिल्यानगर येथील स्थावर मिळकत गट नं. २६५ पै. ० हे १३.०० आर, गट नं. २७४ पै. ० हे ०३.०० आर, गट नं. २७६ पै. ० हे ०८.०० आर, गट नं. २९६ पै. ० हे.०५.०० आर, गट नं. २६९ पै. ०. हे ०८.०० आर |
| ५. | कर्जदार - भोसले आकाश रामदास रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ह.मु. फ्लॅट नं. ६०४, त्रिमुर्ती संगम, संगमवाडी, मेजर राणे शाळे जवळ, पुणे<br>जामीनदार - गव्हाणे भास्कर दिनकर, रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - भोसले अक्षय रामदास, रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ह.मु. फ्लॅट नं. ६०४, त्रिमुर्ती संगम, संगमवाडी, मेजरं राणे शाळे जवळ, पुणे<br>जामीनदार - भोसले रामदास हनुमंत, रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर, ह.मु.. फ्लॅट नं. ६०४, त्रिमुर्ती संगम, संगमवाडी,मेजर राणे शाळे जवळ, पुणे | दाखला क्र.९७३/२०२३ दि.१२/०२/२०२४ रु. ८५,७४,४०९/- व दिनांक ०१/१०/२०२३ पासुनचे १४% प्रमाणे होणारे व्याज | १) मागणी नोटीस दि. १३/०२/२०२४<br>२) जप्ती पुर्व नोटीस दि. १८/०२/२०२४<br>३) स्थावर जप्तीआदेश दि. ०१/०८/२०२५ | कर्जदार भोसले आकाश रामदास यांची मौजे करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथिल स्थावर मिळकत गट नं. १२२० पैः ० हे ८८.०० व ० हे. ०९.००. आर खराबा, गट नं. १२२१ पै. ० हे ७६.०० व ० हे. २१.०० आर खराबा |
| ६. | कर्जदार - भोसले संगिता रामदास, रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - भोसले रामदास हनुमंत, रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - भोसले आकाश रामदास, रा. करंदी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>वरील सर्वजण ह.मु. फ्लॅट नं, ६०४, त्रिमुर्ती संगम, संगमवाडी, मेजर राणे शाळे जवळ, पुणे | दाखला क्र. ९७५/२०२३ दि.१२/०२/२०२४ रु..८६,७२,९२१ व दिनांक ०१/१०/२०२३ पासुनचे १४% प्रमाणे होणारे व्याज | १) मागणी नोटीस दि. १३/०२/२०२४<br>२) जप्ती पुर्व नोटीस दि. १८/०२/२०२४<br>३) स्थावर जप्ती आदेश दि. ०१/०८/२०२५ | कर्जदार भोसले संगिता रामदास यांची मौजे करंदी, ता, पारनेर, जि. अहिल्यानगरं येथिल स्थावर मिळकत गट नं. १२२० पै. ० हे ८९.०० व ० हे. ०९.०० आर खराबा, गट नं. १२२१ पै. ० हे ७७.०० व ० हे. २२:०० आर खराबा |
| ७. | कर्जदार - औटी तुषार रावसाहेब, रा. पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - औटी प्रदिप जयसिंग, रा. पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - दगाबाज भगवान केशव, रा. मुंगशी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर | दाखला क्र.७०५/२०२३ दि.२०/०७/२०२३ रु. १,०५,६५१/- व दिनांक ०१/०४/२०२३ पासुनचे १५% प्रमाणे होणारे व्याज | १) मागणी नोटीस दि. २४/०७/२०२३<br>२) जप्ती पुर्व नोटीस दि. ११/०८/२०२३<br>३) स्थावर जप्ती आदेश दि. ०८/०२/२०२४ | जामीनदार दगाबाज भगवान केशव यांची मौजे मुंगशी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथिल स्थावर मिळकत गट नं. १०१ पै. ० हे. २४.६० आर, गट नं, ९६ पै. ० हे. ५२.१४ आर |
| ८. | कर्जदार - रोकडे दिपक बाळासाहेब, रा. वडगाव सावताळ, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - खटाटे गणेश बन्सी, रा. पळशी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर<br>जामीनदार - चौरे छबु किसन, रा. गाजदिपुर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर | दाखला क्र. ७४०/२०२३ दि.२०/०७/२०२३ रु. २२,४३,५०६/- व दिनांक ०१/०४/२०२३ पासुनचे १५% प्रमाणे होणारे व्याज | १) मागणी नोटीस दि. २४/०७/२०२३<br>२) जप्ती पुर्व नोटीस दि. ०७/०२/२०२४<br>३) स्थावर आदेश जप्ती दि ०५/०८/२०२५ | कर्जदार रोकडे दिपक बाळासाहेब यांची मौजे - वडगाव सावताळ, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथिल स्थावर मिळकत गट नं. ७३ पै. क्षेत्र १ हे. १९.०० व ० हे. १३.०० आर खराबा |

सदरची ताबा नोटीस आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी माझे सही च मुदेसह दिला आहे.
स्थळ- पारनेर

**एस. व्ही.औटी**
विशेष वसुली व विक्री अधिकारी
(महाराष्ट्र सह. संस्था, अधिनियम, १९६१ ये नियम १०७ अन्वये)
पारनेर ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या., पारनेर ता. पारनेर, जि. अहिल्यानगर



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिर्डी लोकसभा जिल्हा संघटकपदी श्री. अमोल चंद्रभान बोऱ्हाडे तसेच अकोले शहर प्रमुखपदी श्री. नितीन नाईकवाडी यांची निवड झाल्याबद्दल लोकनेते मा. नामदार बाळासाहेब थोरात साहेब यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी नगरसेवक भारत चंद्रभान बोऱ्हाडे उपस्थित होते.

# संपादकीय...

## पवित्र आषाढी एकादशी




हिंदू धर्मातील सर्व एकादशींमध्ये आषाढ शुद्ध एकादशी, म्हणजेच आषाढी एकादशी, अत्यंत पवित्र आणि महत्त्वाची मानली जाते. ही एकादशी भगवान श्रीविठ्ठलाच्या भक्तांसाठी श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाचे प्रतीक आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनात या दिवसाला अनन्यसाधारण स्थान आहे. लाखो वारकरी ज्ञानोबा-तुकारामचा गजर करत पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी पायी वारी करतात. ही वारी केवळ धार्मिक यात्रा नसून समता, बंधुभाव, सेवाभाव आणि मानवतेचा महान संदेश देणारी परंपरा आहे.

आषाढी एकादशीला देवशयनी एकादशी असेही म्हणतात. धार्मिक मान्यतेनुसार, या दिवसापासून भगवान श्रीविष्णू क्षीरसागरात योगनिद्रेत जातात आणि पुढील चार महिने म्हणजेच चातुर्मास सुरू होतो. या काळात साधना, जप, तप, दान, व्रत आणि सात्त्विक जीवनाला विशेष महत्त्व दिले जाते. त्यामुळे आषाढी एकादशी हा आत्मपरीक्षण आणि आध्यात्मिक उन्नतीचा प्रारंभ मानला जातो. वारकरी संप्रदायात या दिवसाला विशेष महत्त्व आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखामेळा, संत जनाबाई अशा अनेक संतांनी विठ्ठलभक्तीचा जो संदेश दिला, तो आजही वारीच्या माध्यमातून जिवंत आहे. टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा अखंड जयघोष, अभंगांचे गायन आणि विठ्ठलनामाचा अखंड जप यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिरसाने भारावून जाते.

आषाढी एकादशीचे व्रत केल्याने मन, शरीर आणि आत्मा शुद्ध होतो, अशी श्रद्धा आहे. या दिवशी उपवास, हरिपाठ, भगवद्गीता वाचन, विष्णुसहस्त्रनामाचा जप, भजन-कीर्तन आणि दानधर्म यांना विशेष महत्त्व आहे. उपवासाचा खरा अर्थ केवळ अन्नत्याग नसून वाईट विचार, अहंकार, लोभ, क्रोध आणि मत्सर यांचा त्याग करून सदाचाराचा स्वीकार करणे हा आहे. आषाढी वारी आपल्याला समतेचा महान संदेश देते. वारीत श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, जाती-धर्माचा कोणताही भेद नसतो. सर्वजण विठ्ठलाचे भक्त म्हणून एकत्र चालतात. सेवाभाव, शिस्त, परस्पर सहकार्य आणि मानवतेची शिकवण ही वारीची खरी ओळख आहे. त्यामुळे आषाढी एकादशी हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक एकात्मतेचाही उत्सव आहे.

आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात आषाढी एकादशी आपल्याला संयम, श्रद्धा, सकारात्मकता आणि ईश्वरनिष्ठा यांचे महत्त्व शिकवते. भक्तीमुळे मनाला शांतता, जीवनाला दिशा आणि समाजाला एकतेची प्रेरणा मिळते. म्हणूनच आषाढी एकादशी हा केवळ कॅलेंडरवरील एक सण नसून भारतीय संस्कृतीतील अध्यात्म, भक्ती आणि मानवतेचा अखंड प्रवाह आहे. आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती होत असली, तरी मानवी जीवनात अध्यात्माचे महत्त्व तितकेच कायम आहे. आषाढी एकादशी हा सण आपल्याला भौतिक सुखांपेक्षा मानसिक समाधान, आत्मिक शांती आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व समजावून सांगतो. संतांच्या शिकवणीतून प्रेम, करुणा, क्षमा, सत्य आणि परोपकार या मूल्यांचे जतन करण्याची प्रेरणा मिळते. वारीमध्ये सहभागी होणाऱ्या लाखो वारकऱ्यांची शिस्त, संयम, सेवाभाव आणि परस्पर सहकार्य हे संपूर्ण समाजासाठी आदर्श उदाहरण आहे. पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, व्यसनमुक्ती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेशही वारीच्या माध्यमातून प्रभावीपणे दिला जातो. त्यामुळे आषाढी एकादशी हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजाला सकारात्मक दिशा देणारा जीवनमूल्यांचा प्रेरणादायी सोहळा आहे.

विठ्ठल नामाचा गजर, भक्तीचा सागर आणि समतेचा संदेश हेच आषाढी एकादशीचे खरे वैशिष्ट्य आहे. या पवित्र दिवशी श्रीविठ्ठलाच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होत, सदाचार, सेवाभाव आणि मानवतेचा मार्ग स्वीकारण्याचा संकल्प करूया. पुंडलिक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम! या अखंड नामघोषाने प्रत्येकाच्या जीवनात आनंद, समाधान आणि आध्यात्मिक समृद्धी नांदो, हीच आषाढी एकादशीच्या निमित्ताने

# भोजापूर धरण भरले, कालव्यातून पुरचारीला पाणी सोडले

## संगमनेर व सिन्नर तालुक्यातील बंधाऱ्यांना होणार पाणीपुरवठा

संगमनेर (प्रतिनिधी) भोजापूर धरण पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे धरणात सातत्याने पाण्याची आवक सुरू त्यामुळे ३६१ दशलक्ष घनफूट इतकी क्षमता असलेले भोजापुरचे धरण गुरुवारी पूर्ण क्षमतेने भरले असून ते ओव्हरफ्लो झाले आहे. त्यामुळे या ओव्हरफ्लोचे पाणी डाव्या कालव्यातून संगमनेर तालुक्यातील भोजापुर पूरचारीला सोडले आहे. या पाण्याने चारीवर अवलंबून असणारे गावातील बंधारे भरले जाणार आहे त्यामुळे परिसरातील शेतकरी समाधानी झाला आहे

सिन्नर तालुक्यात म्हाळुंगी नदीवर ३६१ दशलक्ष घनफूट क्षमतेचे भोजापुर धरण आहे या धरणातील पाण्यावर संगमनेर व सिन्नर या दोन तालुक्यातील काहीगावातील शेतकरी अवलंबून आहे. या धरणाच्या ओव्हर फ्लोचे पाणी बंधाऱ्यांना सोडण्याचे नियोजन नाशिक जलसंपदा विभाग यांनी केले आहे . या आवर्तनामुळे कालव्या लगतच्या बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा वाढण्यास मदत होणार असून भूजल पातळी उंचावण्यासही हातभार लागणार आहे. तसेच परिसरातील विहिरी व बोअरवेलच्या



पाणीसाठ्यात वाढ होऊन शेतीला मोठा दिलासा मिळणार आहे. जलसंपदा विभागाने लाभार्थी शेतकरी, ग्रामपंचायती तसेच संबंधित यंत्रणांनी कालव्याजवळ आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले आहे. कालव्यात पाण्याचा प्रवाह वाढणार असल्याने नागरिकांनी कालव्याच्या परिसरात अनावश्यक वावर टाळावा तसेच जनावरे आणि लहान मुलांना कालव्याजवळ जाण्या पासून रोखावे, असेही जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले आहे. भोजापूर धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने

**भोजापुर धरण ओव्हरफ्लो झाले आहें पण नियोजन करत असल्या मुळे हे शक्य झाले आहे. जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आमदार अमोल खताळ यांनी सतत केलेल्या पाठपुराव्यामुळे भजापूर चारीला आवर्तन सोडणे शक्य झाले आहे. या आवर्तनातून संगमनेर तालुक्यातील पळसखेडे ,निमोण,पारेगाव,सोनेवाडी सोनोशी, नान्नज दुमाला या भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. -भिमराज चत्तर (नान्नज)**

संगमनेर आणि सिन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून आगामी काळात सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढणार असल्याने खरीप पिकांना मोठा आधार मिळणार आहे. जलसंपदा विभागाकडून आवर्तनाचे नियोजन बद्ध व्यवस्थापन करण्यात येणार असल्याची माहिती नाशिकजलसंपदा विभागाचे जलसंपदा विभागाचे सहाय्यक अभियंता सुभाष पगारे यांनी दिली.

# अंजुमन उर्दू प्राथमिक शाळेत पालक-शिक्षक मेळावा उत्साहात संपन्न



संगमनेर (प्रतिनिधी) - आधुनिक शिक्षण व आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज तसेच दर्जेदार शिक्षणामुळे जिल्हाभरात नावाजलेल्या संगमनेर येथील अंजुमन उर्दू प्राथमिक शाळेत इयत्ता दुसरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी पालक-शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष व विश्वस्त सय्यद असलम अहमद होते. तर संगमनेर, अकोले व कोपरगाव या भागांसाठी नुकतेच उर्दू विभागाचे केंद्रप्रमुख म्हणून नियुक्त झालेले शेख जुनैद शाह हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या मेळाव्यात विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास, खेळाचे महत्त्व, गृहपाठ, शैक्षणिक प्रगती तसेच पालक व शिक्षक यांच्यातील समन्वय या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सौ. फिरोजा शेख, सौ. काझी महजबीन आणि शादाब शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे शेख जुनैद शाह तसेच माजी प्राचार्य दिलशाद शेख यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या शैक्षणिक कार्याचे व शिक्षकांच्या समर्पित सेवांचे कौतुक केले. कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त शेख रिझवान अब्दुल वहिद, युसुफ खान, मुख्याध्यापक बाबूलाल शेख, नुसरत फाउंडेशनचे अध्यक्ष सय्यद आसिफ अली, जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटरचे अध्यक्ष मोहम्मद इद्रीस शेख, शाळेतील शिक्षक तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अब्दुल रहेमान खान यांनी केले.



पंढरीचीआषाढ वारी ही आपल्या महाराष्ट्राची मोठी धार्मिक, सांस्कृतिक संस्कृती आहे. कानाकोपऱ्यातून आलेले वारकरी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्यासह विविध संतांच्या पालख्यांसोबत पंढरपूरमध्ये एकत्र येतात. चंद्रभागेत स्नान करून विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेणे हे या वारीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. ही संस्कृती जपण्याचे काम भावी पिढी करत आहे. त्याचा एक भाग म्हणून जाजू इंग्लिश मिडीयम स्कूलचे विद्यार्थी विघ्नेश गणेश ताजणे, (विठ्ठल), वैदेही गणेश ताजणे, (रुख्मिणी), आणि अद्वीक प्रमोद ताजणे, वारकरी) अशी वेशभूषा करून लक्ष वेधून घेत होते.

## महाराष्ट्र शासन
### सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
### उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर

यांचे कार्यालय, यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन, तिसरा मजला,
नवीन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर

Email - dr_sangmner@rediffmail.com

जा.क्र वि-१/वसंतराव नाईक पतसंस्था/जाहिर समन्स/कलम १०१/सन २०२६ दिनांक २१/०७/२०२६

### -: जाहीर समन्स नोटीस :-

ज्याअर्थी वादी वसंतराव नाईक नागरी सहकरी पतसंस्था मर्या. वडगाव आनंद (आळेफाटा) ता. जुन्नर जि. पुणे, शाखा साकुर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांनी प्रतीवादी यांचे विरुध्द या कार्यालयात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्रमाणपत्र मिळणे कामी दावा दाखल केला आहे व वसुली प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी खाली नमुद प्रतिवादी यांना नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने नोटीस देण्यात येते की, आपण वार मंगळवार दिनांक ४/८/२०२६ रोजी सकाळी. ११.०० वाजता उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर, यशवंतराव चव्हाण प्रशाकिय भवन, तिसरा मजला, नविन नगर रोड, संगमनेर या कार्यालयात सदर दाव्यामध्ये लेखी तोंडी म्हणणे देणे कामी हजर राहावे. सदर दिवसी व वेळेत आपण हजर न राहील्यास अथवा लेखी म्हणणे आपण सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

| अ. क्र. | दावा क्रमांक | प्रतीवादी (कर्जदार व जामिनदार) | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| 0१ | १०६/२०२६ | १. कर्जदारः गौरव हौशिराम खेमनर, मु.पो. साकुर (जांभुळवाडी), ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>२. जामिनदारः संतोष सखाराम कुदनर, मु.पो. शिंदोडी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदारः अमोल जबा कुदनर, मु.पो. शिंदोडी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>४. सहकर्जदारः हौशिराम कारभारी खेमनर, मु.पो. साकुर (जांभुळवाडी), ता. संगमनेर जि. अहिल्यानगर | ४,६२,२२६/- |
| 0२ | १०७/२०२६ | १. कर्जदारः रमेश रघुनाथ बारवे, मु.पो. रनखांबवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>२. जामिनदारः सुभाष कारभारी शेजवळ, मु.पो. रनखांबवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदारः निलम गुलाब भोसले, मु.पो. बिरेवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर | ११,४३,००२/- |
| 0३ | १०८/२०२६ | १. कर्जदारः गणेश पांडुरंग डोमाळे, मु.पो. मांडवे बुद्रुक ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>२. जामिनदारः पांडुरंग लहानु झिटे, मु.पो. मांडवे बुद्रुक ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदारः भाऊसाहेब सिताराम डोमाळे, मु.पो. मांडवे बुद्रुक ता. संगमनेर जि. अहिल्यानगर.<br>४. जामिनदारः पांडुरंग कोंडिबा डोमाळे, मु.पो. मांडवे बुद्रुक ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>५. जामिनदारः बायजाबाई पांडुरंग डोमाळे, मु.पो. मांडवे बुद्रुक ता. संगमनेर जि. अहिल्यानगर | २७,९०,७१७/- |
| 0४ | १०९/२०२६ | १. कर्जदारः किरण गोरक्षनाथ सागर, मु.पो. बिरेवाडी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>२. जामिनदारः शरद संपत ढेंबरे, मु.पो. बिरेवाडी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदारः अर्जुन भगवंता सागर, मु.पो. बिरेवाडी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर.<br>४. जामिनदारः गोरक्षनाथ सोपान सागर, मु.पो. बिरेवाडी मांडवे बुद्रुक ता. संगमनेर जि. अहिल्यानगर | ८,३५,६३७/- |

ही नोटीस आज दिनांक २१/७/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिली आहे.

**(संतोष कोरे)**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर**


**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME ALTAMASH HAIDER BAIG
TO NEW NAME AS ALTAMASH HYEDAR BAIG
ADDRESS - PUNE NASIK ROAD, LAKHMIPURA, SANGAMNER, TAL SANGAMNER DIST AHMEDNAGAR

**छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा**
8830508244
8380956604
7620388230

**पाहिजेत**
दुकान कामासाठी होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

**तातडीने वॉचमन पाहिजे**
चालू बिल्डिंग साईटसाठी
विश्वासू व जबाबदार वॉचमन पाहिजे
ठिकाण: संगमनेर,
वेळ: सकाळी ८ ते संध्याकाळी ७
- संपर्क -
८८८८१४६६६१

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट - १ (महिला)
वेळ - सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
8080548282
7498749500

**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
- संपर्क -
8888808397

**फॅकल्टी पाहिजे** अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI - 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक - पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727









**पाहिजेत**
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
- संपर्क -
8788945208
8208223721

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग - १ जागा
दुकानकामासाठी - 0२
रविवार सुट्टी असते
आर्कषक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

## दिनविशेष

२००७: प्रतिभा पाटील — यांची भारताच्या १४ व्या राष्ट्रपती म्हणून निवड, तसेच त्या पहिल्या महिला राष्ट्राध्यक्षा आहेत.
१९९७: के. आर. नारायणन — यांची भारताचे १०वे राष्ट्रपती म्हणून निवड.
१९९४: — इस्त्राएल व जॉर्डनमधे १९४८ पासुन सुरू असलेले युद्ध अधिकृतरित्या समाप्त.
१९९२: ऑलिम्पिक — बार्सिलोना, स्पेन येथे २५व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात.
१९८४: स्वेतलाना साव्हित्स्काया — या अंतराळात चालणाऱ्या (Space Walk) पहिल्या महिला अंतराळवीर बनल्या.
१९७८: लुईस जॉन ब्राऊन — जगातील पहिली टेस्ट ट्युब बेबी इंग्लंडमधील लॅंकेशायर येथे जन्माला आली.
१९७३: मार्स ५ स्पेस प्रोब — सोव्हिएत संघाने लाँच केले.
१९७३: मार्स — हे सोव्हिएत संघाचे अंतराळयान प्रक्षेपित.
१९६५: बॉब डायलन — यांनी पहिल्यांदा इलेक्ट्रिक गिटार चा वापर केला. रॉक संगीताची सुरवात येथून झाली असे मानले जाते.

## जन्म

१९७८: लुईझ जॉय ब्राऊन — जगातील प्रथम टेस्ट ट्यूब बेबी
१९३९: एस. रामदास — भारतीय राजकारणी
१९२९: सोमनाथ चटर्जी — लोकसभेचे १४वे सभापती
१९२२: वसंत बापट — कवी, वक्ते, कलावंत, संपादक (निधन: १७ सप्टेंबर २००२ )
१९१९: सुधीर फडके — गायक संगीतकार (निधन: २९ जुलै २००२ )
१९१४: वु वान मौ — दक्षिण व्हिएतनाम देशाचे १०वे आणि अंतिम पंतप्रधान (निधन: २० ऑगस्ट १९९८ )
१९०५: इलियास कॅनेटी — बल्गेरियन-स्विस लेखक — नोबेल पुरस्कार (निधन: १४ ऑगस्ट १९९४ )
१८७५: जिम कॉर्बेट — ब्रिटीश भारतीय वन्यजीवतज्ज्ञ, शिकारी लेखक
११०९: अफोन्सो (पहिला) — पोर्तुगालचा राजा

## मृत्यू

३०६: कॉन्स्टान्शियस क्लोरस — रोमन सम्राट
२०१५: आर. एस गवई — भारतीय वकील आणि राजकारणी (जन्म: ३० ऑक्टोबर १९२९ )
२०१२: बी. आर. इशारा — चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा लेखक (जन्म: ७ सप्टेंबर १९३४ )
२००१: फुलन देवी — भारतीय राजकारणी (जन्म: १० ऑगस्ट १९६३ )
१९८०: इब्न-ए-सफ़ी — भारतीय-पाकिस्तानी लेखक आणि कवी (जन्म: २६ जुलै १९२८ )
१९७७: शिवरामपंत दामले — महाराष्ट्रीय मंडळ, पुणे संस्थेचे संस्थापक
१९७३: लुईस स्टिफन सेंट लोरें — कॅनडाचे १२वे पंतप्रधान
१९७३: डेझसो पॅटंटियस-अब्राहम — हंगेरी देशाचे पंतप्रधान, हंगेरियन वकील आणि राजकारणी (जन्म: १० जुलै १८७५ )
१९५८: हॅरी वॉर्नर — वॉर्नर ब्रदर्सचे सहसंस्थापक (जन्म: १२ डिसेंबर १८८१ )
१८८०: सार्वजनिक काका — समाजसुधारक (जन्म: ९ एप्रिल १८२८ )
१४०९: मार्टिन पहिला — सिसिलीचा राजा




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**25 जुलै**

# प्रतिभा पाटील यांची भारताच्या १४ व्या राष्ट्रपती म्हणून निवड



२५ जुलै २००७ रोजी प्रतिभा देवीसिंह पाटील यांनी भारताच्या राष्ट्रपतीपदाची शपथ घेत देशाच्या इतिहासात नवा अध्याय लिहिला. त्या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती ठरल्या. त्यांनी २००७ ते २०१२ या कालावधीत देशाच्या १२व्या राष्ट्रपती म्हणून कार्यभार सांभाळला. त्यांच्या निवडीमुळे भारतीय लोकशाहीतील महिला नेतृत्वाला नवी दिशा मिळाली आणि सर्वोच्च घटनात्मक पदावर महिलांची क्षमता अधोरेखित झाली.प्रतिभा पाटील यांचा जन्म १९ डिसेंबर १९३४ रोजी महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील नदगाव येथे झाला. त्यांनी जळगाव येथील मूळजी जेठा महाविद्यालयातून राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्यानंतर मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून कायद्याची पदवी प्राप्त करून त्यांनी वकिली व्यवसाय सुरू केला. विद्यार्थीदशेत त्या उत्कृष्ट टेबल टेनिसपटू होत्या आणि विविध स्पर्धांमध्ये त्यांनी उल्लेखनीय यश मिळवले.१९६२ मध्ये त्या प्रथमच महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आल्या. त्यानंतर सार्वजनिक आरोग्य, समाजकल्याण, शिक्षण, पर्यटन यांसह विविध खात्यांच्या मंत्री म्हणून त्यांनी काम केले. त्या राज्यसभेच्या उपसभापती, लोकसभा सदस्य तसेच राजस्थानच्या पहिल्या महिला राज्यपालही राहिल्या. या सर्व जबाबदाऱ्यांमुळे त्यांना प्रशासन आणि लोकसेवेचा मोठा अनुभव मिळाला.राष्ट्रपती म्हणून त्यांनी महिला सक्षमीकरण, मुलींचे शिक्षण, ग्रामीण विकास, विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक न्याय या विषयांवर विशेष भर दिला. देशातील विविध राज्यांना भेटी देऊन त्यांनी विकासकामांचा आढावा घेतला तसेच भारतीय संस्कृती आणि लोकशाही मूल्यांचा प्रचार केला. त्यांच्या कार्यकाळात भारताने अनेक महत्त्वाच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींचा सामना केला.

# संसदेच्या शिस्तीचे प्रतीक : सोमनाथ चटर्जी

**जन्मदिन विशेष**



सोमनाथ चटर्जी हे भारताच्या संसदीय लोकशाहीतील अत्यंत आदरणीय, अभ्यासू आणि निष्पक्ष नेत्यांपैकी एक होते. त्यांचा जन्म २५ जुलै १९२९ रोजी आसाममधील तेजपूर येथे झाला. त्यांचे वडील निर्मलचंद्र चटर्जी हे प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ, संसदेचे सदस्य आणि राजकारणी होते. घरातील बौद्धिक वातावरणामुळे लहानपणापासूनच त्यांच्यावर लोकशाही, न्याय आणि सार्वजनिक जीवनाचे संस्कार झाले. त्यांनी कोलकाता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजमधून शिक्षण घेतले आणि त्यानंतर इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठातून उच्च शिक्षण पूर्ण केले. पुढे लंडनमधील मिडल टेंपलमधून बॅरिस्टरची पदवी मिळवून त्यांनी भारतात वकिली व्यवसाय सुरू केला.१९६८ मध्ये त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) अर्थात सीपीआय (एम) मध्ये प्रवेश केला. १९७१ मध्ये ते प्रथमच लोकसभेवर निवडून आले. त्यानंतर त्यांनी अनेक वेळा लोकसभेचे प्रतिनिधित्व केले आणि देशातील सर्वाधिक अनुभवी संसदपटूंमध्ये त्यांची गणना होऊ लागली. संसदेतील त्यांच्या प्रभावी भाषणशैली, घटनात्मक ज्ञान, संसदीय नियमांचे सखोल आकलन आणि संयमी स्वभावामुळे ते सत्ताधारी तसेच विरोधी पक्षातील नेत्यांच्याही आदराचे पात्र ठरले.२००४ मध्ये त्यांची भारताच्या १४व्या लोकसभेचे सभापती म्हणून एकमताने निवड करण्यात आली. सभापती म्हणून त्यांनी संसदेचे कामकाज निष्पक्ष, शिस्तबद्ध आणि प्रभावी पद्धतीने चालविण्यास प्राधान्य दिले. संसदीय परंपरा, लोकशाही मूल्ये आणि सभागृहाचे स्वातंत्र्य जपण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या मते, सभापती हा कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रतिनिधी नसून संपूर्ण लोकसभेचा संरक्षक असतो.२००८ मध्ये भारत - अमेरिका अणुकराराच्या पार्श्वभूमीवर झालेल्या विश्वासदर्शक ठरावाच्या वेळी त्यांच्या पक्षाने त्यांना सभापतीपदाचा राजीनामा देण्याचे निर्देश दिले होते. मात्र त्यांनी घटनात्मक पदाची निष्पक्षता जपण्याला प्राधान्य देत राजीनामा देण्यास नकार दिला. या भूमिकेमुळे त्यांना पक्षातून निष्कासित करण्यात आले, परंतु त्यांच्या तत्त्वनिष्ठ निर्णयाचे देशभर कौतुक झाले. हा प्रसंग भारतीय संसदीय इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. सोमनाथ चटर्जी यांनी भारतीय संसदीय लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि जबाबदार बनविण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

# पावसाळा, इन्फ्लूएंझा आणि श्वसनविकार
## योग्य माहिती, काळजी आणि वेळेवर उपचार हाच बचावाचा मार्ग

पावसाळ्याचे आगमन म्हणजे हिरवाई, आल्हाददायक वातावरण आणि निसर्गाचा मनमोहक साज. मात्र, या ऋतूमध्ये श्वसनविकारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढते. ग्रामीण भागात विशेषतः सर्दी, खोकला, ताप किंवा घसा दुखणे याकडे अनेकदा नेहमीचा पावसाळी त्रास म्हणून दुर्लक्ष केले जाते. काहीजण घरगुती उपायांवर किंवा स्वतःहून औषधे घेण्यावर भर देतात. परंतु अशा साध्या वाटणाऱ्या लक्षणांमागे इन्फ्लूएंझा, न्यूमोनिया किंवा इतर गंभीर श्वसनविकार दडलेले असू शकतात.

योग्य वेळी निदान आणि उपचार मिळाल्यास बहुतेक श्वसनविकार सहज नियंत्रणात येतात. मात्र, दुर्लक्ष केल्यास काही रुग्णांना अतिदक्षता विभागात उपचारांची गरज भासू शकते.

**इन्फ्लूएंझा म्हणजे काय?**

इन्फ्लूएंझा हा विषाणूमुळे होणारा अत्यंत संसर्गजन्य श्वसनविकार आहे. संक्रमित व्यक्ती खोकताना, शिंकताना किंवा बोलताना हवेत पसरणाऱ्या सूक्ष्म थेंबांमधून हा आजार पसरतो. शाळा, कार्यालये, दिंडी, तीर्थक्षेत्रे आणि गर्दीच्या ठिकाणी त्याचा प्रसार अधिक वेगाने होतो.

**इन्फ्लूएंझाची प्रमुख लक्षणे**

- अचानक १०० ते १०३ओऋपर्यंत ताप
- तीव्र अंगदुखी व सांधेदुखी
- डोकेदुखी
- घसा दुखणे किंवा खवखवणे
- कोरडा किंवा कफयुक्त खोकला
- नाक वाहणे किंवा बंद होणे
- प्रचंड थकवा व अशक्तपणा
- काही रुग्णांमध्ये श्वास घेण्यास त्रास

साध्या सर्दीत लक्षणे हळूहळू सुरू होतात; परंतु इन्फ्लूएंझामध्ये ताप अचानक येतो, अंगदुखी तीव्र असते आणि अनेकदा रुग्णाला अंथरुण धरावे लागते.

**पावसाळ्यात वाढणारे श्वसनविकार**

पावसाळ्यात खालील आजारांचे प्रमाण विशेषतः वाढते-

- इन्फ्लूएंझा
- व्हायरल सर्दी
- ब्राँकायटिस
- न्यूमोनिया
- दम्याचा झटका
- COPD चा त्रास वाढणे

एलर्जीमुळे होणारा खोकला व श्वासाचा त्रास

हवेत वाढलेली आर्द्रता, बुरशी, धूळ, परागकण आणि तापमानातील बदल यामुळे या आजारांना पोषक वातावरण मिळते.



**- डॉ. अमेय अनिल देशमुख,** डी.एन.बी.
श्वसनविकार व अतिदक्षता तज्ज्ञ
(संचालक - देशमुख मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल)

कोणत्या व्यक्तींना अधिक धोका असतो?

खालील व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी-

- ५ वर्षांखालील मुले
- ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक
- गर्भवती महिला
- मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा हृदयरोग असलेले रुग्ण
- दमा किंवा उजझऊचे रुग्ण
- प्रतिकारशक्ती कमी असलेले रुग्ण
- धूम्रपान करणाऱ्या व्यक्ती
- इन्फ्लूएंझामुळे होणाऱ्या संभाव्य गुंतागुंती
- न्यूमोनिया
- रक्तातील ऑक्सिजन कमी होणे
- दम्याचा तीव्र झटका
- उजझऊचे तीव्र बिघाड
- हृदयविकाराच्या गुंतागुंती
- काही रुग्णांना खउण मध्ये उपचारांची गरज

दोन दिवसांनी बरे होईल म्हणून उपचार पुढे ढकलणे धोकादायक ठरू शकते.

**अँटिबायोटिक्सबाबतचा गैरसमज**

इन्फ्लूएंझा हा विषाणूमुळे होतो. त्यामुळे प्रत्येक ताप किंवा खोकल्यासाठी अँटिबायोटिक्सची गरज नसते. डॉक्टरांनी जिवाणूजन्य संसर्ग असल्याचे निश्चित केल्यासच अँटिबायोटिक्स घ्यावीत. अन्यथा भविष्यात औषधांचा परिणाम कमी होण्याचा (Antibiotic Resistance) धोका वाढतो.

**प्रतिबंधासाठी काय करावे?**

- हात नियमित साबणाने धुवा. खोकताना किंवा शिंकताना रुमाल किंवा कोपराचा वापर करा.
- ताप किंवा खोकला असल्यास मास्क वापरा.
- घर व कामाचे ठिकाण हवेशीर ठेवा.
- संतुलित व पौष्टिक आहार घ्या.
- पुरेसे पाणी प्या.
- पुरेशी झोप घ्या.
- नियमित व्यायाम करा.
- धूम्रपान व तंबाखू टाळा.
- फ्लू लसीकरणाचे महत्त्व

दरवर्षी इन्फ्लूएंझा विषाणूमध्ये बदल होत असल्यामुळे दरवर्षी फ्लू लस घेण्याची शिफारस केली जाते.

**विशेषतः खालील व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्याने फ्लू लस घ्यावी-**

- ६५ वर्षांवरील नागरिक
- दमा किंवा COPD चे रुग्ण
- मधुमेहाचे रुग्ण
- हृदयविकाराचे रुग्ण
- गर्भवती महिला
- आरोग्यसेवा कर्मचारी

काही रुग्णांना न्यूमोकोकल लस घेण्याचाही सल्ला दिला जातो.

**डॉक्टरांकडे तातडीने कधी जावे?**

खालीलपैकी कोणतेही लक्षण दिसल्यास त्वरित रुग्णालयात जा-


- श्वास घेण्यास त्रास
- तीन दिवसांपेक्षा जास्त ताप
- छातीत दुखणे
- रक्तमिश्रित खोकला
- वारंवार उलट्या
- अत्यंत अशक्तपणा
- ओठ किंवा नखे निळे पडणे
- लहान मुलाने दूध पिणे बंद करणे
- वृद्ध व्यक्तीमध्ये गोंधळणे किंवा गुंगी येणे

**ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विशेष संदेश**

आजही अनेकजण ताप, खोकला किंवा श्वासाचा त्रास असतानाही डॉक्टरांकडे जाण्यास उशीर करतात. काहीजण मेडिकलमधून स्वतःहून औषधे घेतात, तर काहीजण घरगुती उपायांवरच अवलंबून राहतात. यामुळे योग्य निदान आणि उपचार मिळण्यास विलंब होतो. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीपासून दमा, मधुमेह किंवा हृदयरोग असलेल्या रुग्णांनी कोणतीही लक्षणे दिसताच तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

पावसाळा हा आनंदाचा ऋतू असला तरी श्वसनविकारांच्या दृष्टीने तो अधिक संवेदनशील काळ आहे. योग्य माहिती, वैयक्तिक स्वच्छता, वेळेवर लसीकरण आणि सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे हेच सुरक्षित आरोग्याचे सूत्र आहे.

लक्षात ठेवा खोकला, ताप आणि श्वासाचा त्रास ही साधी लक्षणे समजून दुर्लक्ष करू नका. वेळेवर निदान आणि योग्य उपचार म्हणजेच सुरक्षित आरोग्य. निरोगी श्वास... निरोगी जीवन... हीच प्रत्येकाची जबाबदारी!


मा. श्री. संदीप फटांगरे
संचालक,
साई आशीर्वाद इंडस्ट्रिज


### रविवारी घराघरात जाऊन गणना पत्रके भरणार

अहिल्यानगर, दि. २३ : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघात रविवार, दि. २६ जुलै रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घराघरात भेट देऊन मतदारांकडून गणना पत्रके भरून घेणार असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी दिली.

मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत २० जुलै २०२६ पासून आतापर्यंत अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघातील ३ लाख १५ हजार २६४ मतदारांपैकी १ लाख ९७ हजार ७४७ मतदारांची गणना पत्रके भरून घेण्यात आली असून, हे प्रमाण ६२.७२ टक्के आहे.

रविवारी विशेष मोहिमेअंतर्गत संबंधित मतदान केंद्रांवर बीएलओ उपस्थित राहून मतदारांकडून गणना पत्रके भरून घेणार आहेत. ज्या मतदारांनी अद्याप गणना पत्रक भरून दिलेले नाही, त्यांनी आपल्या विधानसभा मतदारसंघातील संबंधित मतदान केंद्रावर उपस्थित राहून गणना पत्रक भरून द्यावे आणि विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



आषाढी एकादशी निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा !
- शुभेच्छुक -
युवा उद्योग समूह





SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी क्लॉथ सेंटर सिल्क ॲण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर


# शेतपाणंद रस्ते योजना विधानसभा समितीवर पाच जणांची निवड



बादशाह गुंजाळ



संपत फड



म्हतु शेरमाळे



राजाभाऊ वर्पे



सुनिल शिंदे

संगमनेर । प्रतिनिधी

मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजना विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या सदस्यपदी संगमनेर मतदारसंघातील बादशाह गुंजाळ, संपत फड, म्हतु शेरमाळे, राजाभाऊ वर्पे आणि सुनील शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचणारे रस्ते बारमाही, दर्जेदार आणि सुकर करण्यावर शासनाचा भर आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. स्थानिक गरजा लक्षात घेऊन प्राधान्याने रस्त्यांची निवड करणे, कामांच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवणे आणि योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे, ही जबाबदारी समितीवर सोपविण्यात आली आहे.

संगमनेर मतदारसंघ हा कृषिप्रधान भाग असल्याने शेतपाणंद रस्त्यांचे सक्षम जाळे उभारणे ही काळाची गरज आहे. विशेषतः पावसाळ्यात शेतमालाची वाहतूक, खते-बियाणे शेतापर्यंत पोहोचविणे तसेच कृषी यंत्रसामग्रीची ने-आण करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर समितीच्या माध्यमातून रस्त्यांच्या कामांना गती मिळून शेतकऱ्यांचे दैनंदिन व्यवहार अधिक सुलभ होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नवनियुक्त सदस्यांनी शासनाच्या उद्दिष्टांनुसार पारदर्शक, गुणवत्तापूर्ण आणि शेतकरीहिताच्या कामांना प्राधान्य देत रस्ते विकासाची कामे प्रभावीपणे राबविण्याची ग्वाही दिली आहे.

# अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तात्काळ लागू करा

## संगमनेरात सकल मातंग समाजाचा भव्य मोर्चा





संगमनेर (प्रतिनिधी) - अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तत्काळ लागू करावे, या प्रमुख मागणीसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने गुरुवारी (दि. २३) संगमनेर शहरात भव्य मोर्चा काढण्यात आला. यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती प्रशासकीय भवनावर मोर्चा पोहोचल्यानंतर प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे, जय लहुजी, अण्णाभाऊ साठेंचा विजय असो अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. समाजबांधव मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाले होते.

१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्य सरकारांना अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचा घटनात्मक अधिकार प्राप्त झाला आहे. या निर्णयामध्ये सामाजिक न्यायाच्या दृष्टीने वास्तविक समानता, अंतर्गत मागासलेपणा आणि अपुरे प्रतिनिधित्व या निकषांच्या आधारे उपवर्गीकरण करण्याचे तत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील अनुसूचित जाती समाज सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या एकसमान नसून त्यांच्यामध्ये मोठी अंतर्गत विषमता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काही तुलनेने प्रगत जातींनी आरक्षणाचा मोठा लाभ घेतला असताना मातंग समाजासह अनेक जाती आजही शिक्षण, सरकारी सेवा, प्रशासन, उद्योग, अर्थकारण आणि विकासाच्या विविध क्षेत्रांत अत्यल्प प्रतिनिधित्वाच्या स्थितीत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. सामाजिक न्यायाची समान संधी मिळण्यासाठी महाराष्ट्रात अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तातडीने लागू करण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. उपवर्गीकरणामुळे आरक्षणाचा लाभ समाजातील खऱ्या गरजू आणि मागास घटकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असा मुद्दाही आंदोलनकर्त्यांनी मांडला. मोर्चानंतर नायब तहसीलदार मार्तंड माळवे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले.

यावेळी मंजाबापू साळवे, ज्ञानेश्वर राक्षे, संतोष बलसाने, संतोष भडकवाड, संतोष गायकवाड, किशोर आव्हाड, सचिन शेलार, संजय कांबळे, कुंदन खरात, गोरख जगधने, रघुनाथ बलसाने, बाबासाहेब साळवे, अशोक साळवे, दत्ता लाहुंडे, किशोर साळवे, राजेंद्र आव्हाड, संदीप आव्हाड, गणेश बलसाने, दगडू साळवे आदींसह सकल मातंग समाजाचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
नियम व अटी लागू
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओम मयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॅमिनार ऑपरेशन थिएटर
शस्त्रक्रिया
- मेंदुविकार शस्त्रक्रिया
- खुबा प्रत्योरोपण
- गुडघा प्रत्यारोपण
- पोटाच्या शस्त्रक्रिया
- किडनी शस्त्रक्रिया
- मुत्रविकार शस्त्रक्रिया
- दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
- आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- अतिदक्षता विभाग
- अपघात विभाग
- डायलिसीस विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- न्यूरोविभाग
- हृदयरोग विभाग
- मेडिसीन विभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- जॉईंट रिप्लेसमेंट
- स्पाईन सर्जरी
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25